# जाहीर सुचना

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., आर्वी विभागांतर्गत सत्र 2025-2026 (एक वर्ष कालावधी) करीता खालील व्यवसायाकरीता शिकाऊ उमेदवारांची प्रशिक्षणा करीता निवड करावयाची आहे.

**वीजतंत्री (Electrician) 20, तारतंत्री (Wireman) 20, कोपा-पासा (Copa) -09, एकुण 49 शैक्षणिक अर्हता :-** (1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ 10+2 बंधामधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र राज्य माध्यमिक परिक्षा बेस्ट 5 चे गुण ग्राह्य धरले जाणार नाही. (2) राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन वीजतंत्री, तारतंत्री व कोपा-पासा व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळ (MSBTE) या बोर्डाचा डिप्लोमामार्फत इलेक्ट्रीशियन दोन वर्ष अभ्यासक्रम समकक्ष असल्यामुळे वीजतंत्री व तारतंत्री शिकाऊ उमेदवार सुध्दा अर्ज करण्याकरीता पात्र समजण्यात येईल.

**अटी व शर्ती :-** 1) उमेदवारांचे वय 18 वर्ष पुर्ण असणे आवश्यक व कमाल 30 वर्ष असावे तसेच राखीव उमेदवारांकरीता वयाची अट 05 वर्ष शिथिलक्षम राहील. 2) फक्त महावितरण आर्वी विभाग यांच्या कार्यालय क्षेत्रांतर्गत रहिवासी असल्यास उमेदवार अर्ज ग्राह्य धरण्यात येईल. तसेच वर्धा जिल्ह्यातील अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. 3) ऑनलाईन अर्ज करतांना उमेदवारांनी ई-मेल आयडी, भ्रमणध्वनी क्रमांक अचुक नमुद करावा. 4) प्रशिक्षणाचा कालावधी 1 वर्ष राहील. 5) इच्छुक व पात्र उमेदवारांनी **www.apprenticeshipindia.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज जाहीरातीच्या दिनांकापासुन ते **10.11.2025** पर्यंत या कार्यालयाचा आस्थापना क्रमांक **E05202702794** यावर योग्य व परिपुर्ण माहीतीसह सादर करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही. 6)ऑनलाईन नोंदणी अर्जाची प्रत, शैक्षणिक मुळ कागदपत्रे व आधारकार्ड कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या., विभागीय कार्यालय, कदम बिल्डींग, वसंत नगर, आर्वी ता. आर्वी जि. वर्धा येथे जाहीरात प्रकाशित झाल्या पासुन ते **दि. 15.11.2025** पर्यंत सकाळी **10.00** ते सायंकाळी **5.30** पर्यंत अर्ज स्वतः सादर करणे आवश्यक. कार्यालयास प्राप्त अर्जांचाच विचार करण्यात येईल. 7) शिकाऊ उमेदवार यांची निवड माध्यमिक शालांत परिक्षेच्या गुणांची टक्केवारी SSC तसेच आय.टी.आय. गुणांची टक्केवारी याची सरासरी विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार करून शिकाऊ उमेदवारांची निवड करण्यात येईल. 8) जाहीरातीमध्ये अंशतः बदल किंवा संपुर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार कंपनी राखुन ठेवित आहे.

**कार्यकारी अभियंता,**
**म.रा.वि.वि.कं.म.र्या., संवसु विभाग, आर्वी**

**पि.आर.ओ.नं. 119**